नि.क्रं. ७३ खालील आदेश

सदर अर्ज वादीतर्फे देण्यात आला असून त्यांनी नमूद केल्यानुसार प्रतिवादी याने आपल्या उलट तपासात निशाणी ५२ वरील दि.०९/०८/२०१६ रोजीच्या पावतीवरील अंगठा व सही त्याची असल्याचे अमान्य केले आणि तज्ञांकडून या सहीची तपासणी करण्यास आपली हरकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे ती वादग्रस्त झाली आहे. प्रतिवादीने दाखल केलेली व त्यास मान्य असलेले दि.०२/०३/२०१५ व ०१/०४/२०१६ रोजीची ठरावपत्रे, दि.१०/०४/२०१५व दि.११/०६/२०१५ रोजीच्या पावत्या, दि.१९/०४/२०१८ प्रतिवादीने वादीला पाठविलेली नोटीस, प्रतिवादीची कैफीयत, त्याचे वकीलपत्र, शपथपत्र, पत्तामेमो या कागदपत्रांसह वादग्रस्त दि.०९/०८/२०१६ रोजीची पावती यावरील सहया व अंगठे प्रतिवादीचेच आहेत किंवा कसे याची तपासणी करण्यासाठी हस्ताक्षर तज्ञांकडे पाठवाव्यात अशी विनंती करण्यात आली.

प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यानुसार नि.५२ वरील सही त्याची नसून ती बनावट आहे. या सहीची पडताळणी होऊन मिळण्यास तोही तयार आहे. त्यामुळे न्यायालयाने आवश्यक त्या आदेश करावे अशी विनंती करण्यात आली.

उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

दि. ०९/०८/२०१६ रोजीच्या पावतीबद्दल प्रतिवादीच्या उलटतपासांमध्ये त्याने सदर सही नाकारली आहे. नि.५२ ही रशीद पावती श्रीकांत बडगीरे या साक्षीदारामार्फत शाबित करण्यात आली मात्र त्यावरील सही प्रतिवादीने नाकारली. या सहीसोबतच त्यावर लिहून घेणार व लिहून देणार यांचे अंगठेही उमटवले आहेत. सदर नि.५२ या वादग्रस्त कागदावरील सही व अंगठा आणि प्रतिवादी याला मान्य असलेला त्याचा कैफीयत, वकीलपत्र व अन्य शाबीत कागदांवरील त्याचे अंगठे या दोन बाबी नजरेने न्यायालयास भारतीय पुरावा कायदा १८७२ कलत ७३ प्रमाणे पडताळता येणार नाही. याकरीता या कायदयाच्या कलम ४५ प्रमाणे प्रतिवादीस मान्य असलेले कागदांवरील त्याच्या सहया व अंगठे आणि नि.५२ वरील त्याला अमान्य असलेली सही व अंगठा याची पडताळणी करण्यासाठी श्री.सुरेश एन.कटारे या हस्ताक्षर तज्ञांची नेमणूक करण्यात येते. त्यांची नेमणूक करण्यास उभय पक्षानी संमती दिली आहे. श्री कटारे हे विविध न्यायालयांमधये, पोलिस ठाण्यात, तसेच न्यायिक अधिकारी प्रशिक्षण केंद्रामध्ये मानद प्रशिक्षक म्हणून कार्यरत असल्याबद्दल उल्लेखित आहे. यास्तव प्रस्तुत अर्ज मंजूर करत असताना अर्जामध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे त्याची एक प्रत न्यायालयात ठेवून श्री.सुरेश कटारे यांच्या Akshar

Handwriting Analysis ,18 Chetan Trade Centre, Opp.S.F.S.School. Jalna Road, Cha.Sambhaji Nagar या पत्त्यावर वादीच्या खर्चाने पाठविण्यात यावी. शक्यतोवर या संपूर्ण मुळ कागदांचा सीलबंद लखोटा मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे लातूर जिल्हा न्यायालयातून पत्रव्यवहार घेऊन जाणा-या बेलीफासोबत दयावा जेणेकरुन मुळ कागदपत्रे सुरक्षीतपणे संबंधित तज्ञांकडे पोहोचतील. संबंधीत तज्ञ यांनी या कागदपत्रांसाठी त्यांचे पडताळणी शुल्क तातडीने न्यायालयास कळवावे. जेणेकरुन ते शुल्क देण्यासाठी वादींना आदेशीत करता येईल. श्री. सुरेश कटारे यांच्याकडून शुल्कांबाबत न्यायालयास कळविल्याबाबत ७ दिवसांत जर शुल्क भरले नाही तर सदरील आदेशाचा अंमल नाहीसा होईल. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर संबंधीत तज्ञ यांनी त्यांना दिलेली सर्व मुळ कागदपत्रे व आपला अहवाल सीलबंद करुन न्यायालयाच्या वर नमूद बेलीफांकडे सुपूर्द करावा. पोस्ट किंवा कुरीअर सेवेचा वापर करु नये. सदरील अहवाल तज्ञानी फीची रक्कम मिळाल्यापासून ७ दिवसांत दयावा असे त्यांना कळविण्यात यावे.

स्वाक्षरीत/-

[एस.एन.सरडे]
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.

दिनांक ०३/०७/२०२५.